REGISTERED No. B 3434.

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ | पुणें, बुधवार तारीख १७ सप्टेंबर १९४७ | अंक ३८

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

# विविध माहिती

**हिंदुस्थानच्या लष्करांत कपात**—जपानविरोधी युद्धाचा शेवट झाल्यापासून ते १९४७ च्या जुलैअखेर हिंदुस्थानच्या लष्करांतून १६,३७,९१० सैनिक निवृत्त झाले. ह्यापैकीं ३२,१८५ ब्रिटिश व अधिकारी होते. जुलै, १९४७ मध्यें ९९१ अधिकारी, ६,५४४ हिंदी सैनिक, ६,५२२ बिनलढाऊ सैनिक व १,२१६ ब्रिटिश शिपाई सेवानिवृत्त करण्यांत आले. जुलै महिन्यांत १३९ सैनिकांच्या तुकड्या मोडून टाकण्यांत आल्या. आतापर्यंत एकंदर ८,५२४ पथकें मोडून टाकण्यांत आलीं.

**कापडाच्या उत्पादनाची घट**—मुंबईच्या गिरण्यांतील कामगारांनी कामाची गति मुद्दाम मंद केल्यामुळें दररोज १० लाख वार कापडाचें उत्पादन कमी होत आहे, असा अधिकृत अंदाज आहे. ह्याच अंदाजाप्रमाणें जुलै महिन्यांत ९ ते १० हजार माग चालू नव्हते व त्यामुळें २,७०,००० कामाचे तास फुकट गेले. ऑगस्ट, १९४६ मध्यें गिरण्यांतील कामाचे तास ९ तासा ऐवजीं ८ तास करण्यांत आले. तत्पूर्वी मुंबईतील गिरण्या दर महिना १२ कोटी वार कापड निर्माण करीत असत. कामाचे कमी झालेले तास आणि जातीय दंगे ह्यामुळें मासिक उत्पादन १० कोटी वारांवर आलें, आणि मंद गतीच्या कामामुळें तें आणखीच घटलें.

**विक्री करासंबंधींचे नियमांत दुरुस्ती**—विक्रीकरासंबंधीच्या नियमांत दुरुस्ती करण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे. सदरहू नियमांतील ४८ व्या नियमान्वयें सेल्स टॅक्स कमिशनरच्या हुकुमाविरुद्ध फेरविचारासाठी करावयाचा अर्ज हा हुकूम निघाल्या दिवसापासून ३० दिवसांचे आंत सेल्स टॅक्स ट्रिब्युनलकडे पाठवावयाचा असतो. परंतु हें ट्रिब्युनल ता. १ सप्टेंबर, १९४७ पासून अस्तित्वांत येत असल्याकारणानें ट्रिब्युनलकडे पाठवावयाच्या ह्या अर्जाची मुदत ट्रिब्युनल स्थापन झाल्यापासून अथवा हुकूम निघाल्यापासून, यापैकीं जो दिवस नंतर येईल, त्या दिवसापासून ३० दिवसांचे आंत असावी, असें सरकारनें ठरविलें आहे.

**सातारा येथें सुताची नवी गिरणी**—सातारा येथील दि टेक्स्टाईल्स लि. कंपनीस नुकतीच मध्यवर्ती सरकारकडून १२ हजार चात्यांची सुताची गिरणी उभारण्यास परवानगी मिळाली असून आतां या कंपनीचे संचालक कंपनीचें भांडवल ७० लाखांनी वाढविण्याचे विचारांत आहेत असें समजतें. या कामीं महाराष्ट्रीय धनिकांचें सहाय्य मिळविण्यासाठी कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. लक्ष्मणराव पेंडसे व कंपनीचे कायद्याचे व आर्थिक सल्लागार श्री. वसंतराव म्हैसूर हे लवकरच महाराष्ट्रभर दौरा काढण्याचे विचारांत आहेत.

**वालचंदनगर इंडस्ट्रीज लि., मुंबई**—ऊस लागवड, डिस्टिलरी इत्यादींचा धंदा करणाऱ्या वरील पब्लिक कंपनीस ५०½ लक्ष रुपयाचें भांडवल उभारण्यास सरकारी परवानगी मिळाली आहे.

**मुंबई प्रांतांतील औद्योगिक कलह**—जून १९४७मध्यें मुंबई प्रांतांत एकूण ६६ औद्योगिक कलह निर्माण झाले. ह्या औद्योगिक कलहांत ५२,९६९ कामगार सामील झाले, आणि त्यामुळें १,०६,७९९ कामाचे दिवस वाया गेले.

**गुजराथ विद्यापीठासाठी १ कोटि रुपयांचा फंड**—गुजराथ विश्वविद्यालयाच्या स्थापनेसाठी १ कोटि रुपयांचा फंड उभारण्यांत येत आहे, असें श्री. जी. व्ही. मावळंकर ह्यांनीं जाहीर केलें आहे.

**पाकिस्तानी तिकिटें**

पोस्टाच्या तिकिटांवर "पाकिस्तान" हा शब्द १ ऑक्टोबर १९४७ पासून पाकिस्तानांत दिसूं लागेल हा शब्द ज्यांवर छापलेला नाहीं, अशीं तिकिटें लावल्यास तिकिटें लावलीच नाहींत, असें समजण्यांत येईल. ज्यांचे जवळ जुनीं हिंदी तिकिटें आहेत, त्यांनीं तीं १९४७ साल संपण्याचे आंत बदलून घ्यावयाचीं आहेत.

**बँकांच्या वार्षिक सभा**

| | |
|---|---|
| २१—९—४७ | कराड अर्बन को. बँक लि., कराड |
| २१—९—४७ | पूना अर्बन को. बँक लि., पुणें |
| २१—९—४७ | लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर |
| २१—९—४७ | कॉसमॉस को. अर्बन बँक लि., पुणें |
| २३—९—४७ | दि बेळगांव बँक लि., बेळगांव |
| २५—९—४७ | कल्याण पीपल्स को. बँक लि., कल्याण |
| २८—९—४७ | पुणें सें. को. बँक लि., पुणें |
| २८—९—४७ | पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि., पुणें |
| २८—९—४७ | दि महाड को. अर्बन बँक लि., महाड |
| २८—९—४७ | दि सोलापूर डि. सें. को. बँक लि., सोलापूर |
| २८—९—४७ | सन्मित्र को. अर्बन बँक लि., मुंबई |
| २८—९—४७ | धुळें अर्बन को. बँक लि., धुळें |
| २८—९—४७ | दि मराठा मार्केट पीपल्स को. बँक लि., मुंबई |
| २९—९—४७ | बॉंबे प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँक लि., मुंबई |


अधिकृत भांडवल : १० लक्ष रु.
विक्रीस काढलेलें भांडवल : ५ लक्ष रु.
खपलेलें भांडवल : १,३४,००० रु.

## जेकॉप एंजिनिअर्स लि.

(पूर्वीची १९३६ सालीं स्थापन झालेली जनरल एंजिनिअरिंग कं.)
देशमुखवाडी, पुणें २
प्रेफरन्स शेअर्स प्र. १०० रु.
ऑर्डिनरी शेअर्स प्र. १०० रु.

गेल्या १० वर्षांतील उत्पादन—शिट्या, दिवाळीचीं पिस्तुलें, खेळणीं, टाइपरायटर स्पून्स, दूध बाटल्या बुचें, इ.
चालू यंत्रोत्पादन—पॉवर हॅमर मशीन्स, हायड्रॉलिक प्रेसेस, शेतकीचीं पेरणीचीं व मळणीचीं बैलांनीं चालणारीं शेंगा फोडण्याचीं यंत्रें, शेंगा फोडण्याचीं हातयंत्रें, इं.

लिमिटेड कंपनीनें चालू कारखानाच विकत घेतला असल्यामुळें प्रथम वर्षीहि डिव्हिडंड वाटण्यास अडचण पडणार नाहीं असा संचालकांना विश्वास वाटत आहे. म्हणून,

**तावडतोब शेअर्सकरतां मागणी करा**
आणि औद्योगीकरणास हातभार लावण्याचें श्रेय मिळवून शिवाय स्वतःचाहि फायदा करून घ्या.

डायरेक्टर मंडळांत सांगलीचे श्रीगजानन मिल्सचे धनि श्री. वेलणकर, मुंबईचे श्री. एस. व्ही. सोवनी व श्री. ल. गो. विंझे, पुण्याचे श्री. न. सि. गोडबोले, श्री. पु. रु. साठे, श्री. न. प. केळकर, श्री. वा. ल. कुंटे, ह्यांसारखी मंडळी आहेत.

मे. एच व्ही काणे आणि कं.
मॅनेजिंग एजंट्स

# अर्थ

बुधवार, ता. १७ सप्टेंबर, १९४७




प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## हिंदी रुपयाची पत आंतरराष्ट्रीय बाजारांत कशी वाढेल ?

हिंदी रुपायाची गेल्या मार्चमध्यें मध्यवर्ती विधिमंडळानें पास केलेल्या बिलान्वयें स्टर्लिंगपासून मुक्तता करण्यांत आली व घटनेनुसार रुपयाला आंतरराष्ट्रीय नाणें- बाजारांत स्वतंत्र, इंग्लंडच्या परिस्थितीवर अवलंबून न राहणारें, असें स्थान प्राप्त झालें. आंतरराष्ट्रीय चलननिधीचा हिंदुस्थान सभासद झाला असून रुपयाची किंमत ४·१४५ ग्रेन शुद्ध सोनें इतकी निश्चित करण्यांत आली आहे. १५ ऑगस्टपासून प्राप्त झालेल्या स्वातंत्र्यामुळें रुपयाची भूमिका जास्त मजबूत झाली असें दिसावयास वाटतें.

परंतु वसाहतींचें स्वातंत्र्य प्राप्त झालें नाहीं तोंच डॉलरचें संकट ब्रिटन इ· राष्ट्रांवर ओढवल्यामुळें, पर्यायानें डॉलरचें संकटहि हिंदुस्थानवर ओढवलें आहे. तरी पण ब्रिटननें स्टर्लिंग ठेवीपैकी साडेसहा कोटी पौंड रकम हिंदुस्थानला खरेदी करण्यासाठी खुली केल्यामुळें, निदान धान्य खरेदी तरी आपल्याला परदेशांतून करतां येईल. या सर्व परिस्थितीचा विचार केला म्हणजे असें लक्षांत येतें कीं गेल्या एका वर्षात आंतरराष्ट्रीय जगांत झालेल्या घटनांमुळें ( हिंदुस्थानचें आंतरराष्ट्रिय चलननिधीचें व बँकेचें सभासदत्व व रुपयाची स्टर्लिंगपासून बंधमुक्तता ) प्रत्यक्ष व्यवहारांत हिंदी रुपयावरची आपत्ति अजून टळलेली नाहीं. ती आपत्ति टळावयाची म्हणजे हिंदी चलनाला आंतरराष्ट्रीय बाजारांत स्वतःची पत निर्माण करतां आली पाहिजे. ती कशी निर्माण करतां येईल याबद्दल कांहीं विचार येथें व्यक्त केले आहेत.

ही पत आंतरराष्ट्रीय व्यवहारांत निर्माण करावयाची म्हणजे हिंदुस्थानाची उत्पादन शक्ति फार मोठ्या प्रमाणांत वाढली पाहिजे व त्याचबरोबर जनतेची व देशाची क्रयशक्तिहि सुधारली पाहिजे. अमेरिकेच्या डॉलरला आज जगांत पत आहे याचें कारण अमेरिकेजवळ तयार असलेला हरतऱ्हेचा विक्री माल जगांतील निरनिराळ्या देशांना पाहिजे आहे पण तो विकत घेण्याची ऐपत बहुतेक देशांजवळ जरूर त्या प्रमाणांत नाहीं. या शिवाय प्रचंड सुवर्णसंचय व भांडवली माल या दृष्टीनेंहि अमेरिकेची परिस्थिति फार मजबूत, एवढेंच नव्हे तर विलोभनीय आहे. डॉलरच्या पाठीमागें प्रचंड उत्पादन शक्ति व सुवर्ण संचय, भांडवली माल व विक्री माल यांचा आधार आहे. ह्या भरभक्कम आधाराच्या जोरावर आज आर्थिक जगांत डॉलरला महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे.

आतां तात्विक दृष्ट्या आंतरराष्ट्रीय व्यवहारार्थी रुपया स्वतंत्र झाला असला तरी प्रत्यक्ष व्यवहारांत हिंदी रुपयाला कोणी विचारीत नाहीं. याचें कारण इंग्लंडकडे स्टर्लिंग बॅलन्सच्या रुपानें फार मोठें येणें असलें तरी १९४७ साल अखेर त्यांतील फक्त साडे सहा कोटी पौंड मिळावयाचे आहेत.

बाकीच्या रकमेच्या बाबतींत पाकिस्तान व हिंदुस्थान सरकारांमार्फत इंग्लंडशीं दीर्घमुदतीचा करार व्हावयाचा आहे व या ठरावाचें स्वरूप काय असूं शकेल याबद्दल आज निश्चित कांहींच सांगतां येत नाहीं. इंग्लंड व्यतिरिक्त इतर जगांतील देशांचा विचार केला तर त्यांच्याशीं असणारे आर्थिक संबंध हे आपणाला त्या त्या देशांना पुरवितां येणारा माल व त्या त्या देशांकडून माल खरेदी करण्याची आपली ताकत यावरच अवलंबून राहातील. अशीं व्यापारी देवघेव एकेका देशाशीं स्वतंत्र रीत्या तोंडमिळवणी करणारी झाली नाहीं तरी एकंदर सर्व राष्ट्रांशीं मिळून होणाऱ्या व्यापारी उलाढालींत तोंडमिळवणी झाली पाहिजे, तरच रुपायाची किंमत आंतरराष्ट्रीय व्यवहारांत स्थिर राहील व असे व्यवहार जितक्या प्रमाणांत हिंदुस्थानकडे अनुकूल तफावत होण्याच्या दृष्टीनें होतील तितक्या प्रमाणांत रुपया मजबूत होत जाईल. यावरून असें दिसतें कीं तात्त्विक दृष्ट्या चलनांत किंवा चलनपद्धतींत कितीहि सुधारणा झाली तरी बाह्य जगाशीं संबंध आला म्हणजे देशाची आर्थिक परिस्थिति, उत्पादन शक्ति व विक्री आणि भांडवली माल निर्यात करण्याची शक्ति ह्याच गोष्टी चलनपद्धतीची किंवा चलनांतील मुख्य नाण्याची आंतरराष्ट्रीय बाजारांत पत वाढवितात.

सध्यां हिंदुस्थानची निर्गतीच्या दृष्टीनें चहा, ताग, लाख, मॅंगनीज, अभ्रक या बाबतींत स्थिति समाधानकारक आहे. त्या नंतर कातडीं व कापूस याहि बाबतींत बरी आहे. परंतु एवढ्या निर्गतीमुळें आपली आयातीची गरज स्वतंत्ररीत्या पूर्ण होईल अशी स्थिति नाहीं. या दृश्य समाधानकारक व्यवहारांतहि, चहा व ताग या धंद्यांत गुंतविल्या गेलेल्या कांहीं परराष्ट्रीय भांडवलामुळें, या निर्गतीचा फायदा पूर्णपणें हिंदी जनतेच्या पदरांत पडत नाहीं. कारण, कांहीं निर्गत मालामुळें सरते शेवटीं हिंदुस्थानांतून अदृश्य निर्यात होण्यालाच मदत होते.

राजकीय स्वातंत्र्य मिळालें असलें तरी आर्थिक स्वातंत्र्य प्रत्यक्ष कृतीनें म्हणजे उत्पादनावर भर देणाऱ्या कार्यक्रमांनीं व अजूनहि निरनिराळ्या धंद्यांत गुंतविल्या गेलेल्या परराष्ट्रीय भांडवलाच्या हिंदीकरणानें, इत्यादि उपायांनीं पूर्णपणें पदरांत पाडून घेतलें पाहिजे. डॉलरच्या तुटवड्यामुळें निर्माण झालेल्या संकटाच्या मामुली विवेचनानें हा प्रश्न सुटणारा नव्हे, रुपयाची स्टर्लिंगपासून मुक्तता झाली तरीहि हा प्रश्न सुटत नाहीं. या सर्व परिस्थितीवर एकच उपाय हा दिसतो कीं इतर राष्ट्रांकडून नक्की मागणी येईल असा कच्चा व विक्री माल शक्य तितका देशी मालकीच्या भांडवलानें ( निरुपद्रवी अटींवर उसनवार घेतलेलें परराष्ट्रीय भांडवलहि चालेल ) उत्पादन करून त्याची निर्यात हिंदुस्थानास करतां आली पाहिजे.

**ऑस्ट्रेलिआंतील कामाचे तास** — पुढील वर्षाच्या जानेवारीपासून ऑस्ट्रेलिआंतील सर्व उद्योग-धंद्यांतून ४० तासाचा कामाचा आठवडा सुरू करण्यांत यावा असा निर्णय ऑस्ट्रेलिअन फेडरल आर्बिट्रेशन कोर्टानें नुकताच दिला. हा निर्णय अमलांत आला तर योग्य तितका वेळ अधिक काम करण्याला मात्र सवड ठेवण्यांत आली आहे.

# बँकांचे वार्षिक अहवाल

### ✓ दि. पूना अर्बन को. बँक लि., पुणें

वरील संस्थेनें गेल्या दोन वर्षांत श्री. मोतीराम नारायण पाटसकर ह्यांच्या नेतृत्वाखालीं चांगलीच प्रगती केली आहे. शेअर भांडवल पुष्कळ वाढलें आहे, ठेवींत मोठी भर पडली आहे, मेंबरांस कर्ज अधिकाधिक प्रमाणांत मिळत आहे आणि थकबाकीचें प्रमाण उतरतं आहे. गेल्या वर्षी बँकेस १,७३६ रु. नफा झाला. २¾% डिव्हिडंड व ½% स्वातंत्र्यदिन बोनस मिळून ३¼% भागीदारांस देण्यास १,०१२ रु लागतील.

### ✓ दि लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर

अहवालाचे मुदतींत बँकेचें शेअर भांडवल ८,२१० रु. नी वाढून तें ३८,२०० रु. झाले. दिलेल्या कर्जांत बरीच वाढ झाल्यामुळें पुढील वर्षी बँकस जास्त नफा होईल. ठेवींची रकम थोडीशी कमी झाली आहे. पगारवाढ, जादा नेमणुका, विशेष छपाईखर्च, ह्या सर्वांमुळें खर्च वाढूनहि नफा ३,४९० रु. झाला. भागीदारांस ५% डिव्हिडंड मिळेल. श्री. अ. कों. कुलकर्णी, बी. ए., बी. टी., हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. ए. रा. देशमुख, जमीनदार, हे ऑ. मॅ. डायरेक्टर आहेत.

### ✓ दि कल्याण पीपल्स को. बँक लि.

ता. ५-११-४५ रोजीं वरील बँकेनें ना. वैकुंठराय मेहता ह्यांचे हस्तें नवीन क्षेत्रांत पदार्पण केलें, म्हणजे संपूर्ण बँकिंगच्या धंद्यास प्रारंभ केला. बँकेनें भात, कोळसा, सोनें-चांदी, वगैरे मालावर कर्ज देण्यास प्रारंभ केल्यापासून त्याचा पुष्कळांस फायदा मिळत आहे. बँकेचें भाग भांडवल ५७ हजार रु. असून तिच्या रिझर्व्ह व इतर फंडांत सुमारें २६ हजार रु. आहेत. एकूण ताळेबंद ५ लक्ष, ६७ हजारांचा आहे. अहवालाचे वर्षी बँकेस १६ हजार रु. नफा झाला असूनहि मॅ. डायरेक्टर श्री. गंगाधर वासुदेव भिडे ह्यांनीं विनावेतन काम केलें आहे. भागीदारांस द. सा. द. शे. ४-११-० डिव्हिडंड मिळेल. श्री. दौलतराव जयरामराव झुंजारराव हे बँकेचे चेअरमन आहेत.

### ✓ दि कॉसमॉस को. अर्बन बँक लि., पुणें

अहवालाचे वर्षी कर्जाऊ दिलेल्या रकमेंत वाढ होऊन कर्जाची बाकी वाढली असली तर थकबाकीची रकम ६,६५० रु. नीं कमीच झाली आहे, ह्यावरून वसुलीचा समाधानकारकपणा दिसून येईल. थकबाकीचें प्रमाण ५.७% असून तें मागील वर्षापेक्षा ४.९ नें कमी आहे. बँकेस ४,८६३ रु. निवळ नफा झाला. ३¾% दरानें भागीदारांना डिव्हिडंड मिळणार आहे.

### ✓ पुणें सें. कों. बँक लि.

अहवालाचे वर्षी शेतकी ३१ व बिगर शेतकी २ अशा ३३ नवीन सोसायट्या बँकेच्या भागीदार झाल्या. धान्य वाटपाचें काम ६६ सहकारी सोसायट्यांमार्फत त्यांचे गांवीं व बँकेमार्फत ४ ठिकाणीं चालू आहे. या प्रकारचें काम करण्यांत कांहींहि धोका नाहीं असा विश्वास स्थानिक सहकारी संस्थांना वाटावा व जनतेची सेवा करण्यास त्यांना प्रोत्साहन मिळावें, ह्या हेतूनें बँकेनें ही कामें घेतली होती. आतां स्थानिक सहकारी संस्था हें काम करण्यास पुढें येत आहेत, तेव्हां बँकेनें चालविलेलीं केंद्रें हळूहळू स्थानिक संस्थांनीं मागणी केल्यास त्यांचेकडे तीं वर्ग करण्याचें धोरण बोर्डानें ठरविलें आहे. जिल्ह्यासाठी स्वतंत्र खरेदी–विक्री संघ अस्तित्वांत आल्यानें, शेतकऱ्यांस खतें व अवजारें पुरविण्याचा व्यवहार बँकेनें केला नाहीं. नोकरांच्या आपत्ती निवारणासाठीं स्वतंत्र फंड काढण्याचा उपक्रम बँकेनें करून त्या फंडांत अहवालाचे वर्षी ५,००० रु. नफ्यापैकीं दाखल करण्याचें योजिलें आहे. सालोसाल त्यांत भर टाकली जावी अशी बोर्डाची शिफारस आहे अहवालाचे वर्षी बँकेस ५४,७६८ रु. नफा झाला. भागीदारास ६% + १% स्वातंत्र्यदिन बोनस=७% डिव्हिडंड मिळणार आहे.

### ✓ बाँबे प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँक लि., मुंबई

आणखी ५ लक्ष रुपयांच्या बँकेच्या डिबेंचरांस सरकारनें गॅरंटी देण्याचें ठरविलें आहे. डिबेंचर्सच्या अटी अद्याप ठरावायाच्या आहेत. प्रांतिक बँकेस जोडलेल्या कांहीं प्राथमिक बँकांचें काम कमी झालें आहे. अहवालाचे वर्षी प्रांतिक बँकेनें ३ लक्ष, ८९ हजारांची २७५ नवीं कर्जें दिलीं. बँकेस ६,९०३ रु. नफा झाला. भागीदारांस द. सा. द. शे. १५ आणे डिव्हिडंड मिळेल.

### ✓ दि बेळगांव बँक लि., बेळगांव

३० जून, १९४७ अखेरच्या वर्षी बँकेनें उत्कृष्ट प्रगति केली आहे. खेळतें भांडवल ६½ लक्ष रुपयांनीं वाढून तें सुमारें ५५ लक्ष रु. झालें आहे. नोकरवर्गाच्या बोनससाठी ४,८०० रु. बाजूस काढूनहि बँकेस ३१,११३ रु. निवळ नफा झाला आहे. भागीदारांस ६¼% करमाफ डिव्हिडंड देण्यास २३,०१५ रु. लागतील. अहवालाचे वर्षी बँकेनें बैल होंगल, अथणी व मिरज येथें आणखी तीन शाखा उघडल्या. त्यांचें काम समाधानकारक चालू आहे. आतां शाखांची संख्या १८ झाली आहे. बँकेस कमिशनच्या रुपानें उत्कृष्ट प्राप्ती होत आहे. श्री. एम. जी. हेरेकर, बँकर व लँडलॉर्ड हे बँकेचे चेअरमन असून श्री. ए. आर. नाईक, बी. ए., बी. एससी., एलएल. बी. हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. खालील तक्ता बँकेची प्रगति स्पष्टपणें दाखवितो.

## दि बेळगांव बँक लि., बेळगांव

### प्रगतीचा तक्ता

| | १९४१–४२ | १९४२–४३ | १९४३–४४ | १९४४–४५ | १९४५–४६ | १९४६–४७ |
|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| भाग भांडवल | ८६,५३२ | ९९,८८० | ९९,८८० | २,४९,५१० | ३,२५,११० | ४,६१,१७० |
| फंड्स | १६,७६९ | १६,१२७ | १७,५८३ | ३१,९९३ | ५०,२७५ | ८२,९३७ |
| ठेवी | ७,२६,५७१ | १४,१३,७८३ | १९,८२,५७० | २९,१३,३१५ | ४०,८२,९४६ | ४२,१२,६११ |
| कर्जे | ४,७४,३६० | ९,७८,९०३ | १४,१२,५८८ | १३,९०,४९६ | १७,३०,६७६ | १४,९६,२५६ |
| निवळ नफा | ४,१४२ | ३०,९६९ | १८,०४७ | १८,९०० | २७,२७३ | ३१,११३ |
| दिलेलें डिव्हिडंड ( करमाफ ) | ६¼% | ६¼% | ६¼%+१¼%बोनस | ६¼% | ६¼% | ६¼% |
| खेळतें भांडवल | ८,४८,९८२ | १५,५५,१५८ | २५,७६,८२९ | ३४,१२,०३९ | ४८,२२,१६५ | ५४,६०,९५७ |

## परदेशांतील आर्थिक बातम्या

**ऑस्ट्रेलिआचें सोनें ब्रिटनला**—ऑस्ट्रेलिअन कॉमनवेल्थ बँकेचे गव्हर्नर ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं ऑस्ट्रेलिआनें आपलें सोन्याचें भावी उत्पादन ब्रिटनला विकण्याचा जो निर्णय घेतला आहे, त्यामुळें ब्रिटनच्या डॉलर्सच्या सांठ्यात ४ कोटींची भर पडणार आहे. तथापि, त्यामुळें ऑस्ट्रेलिआच्या अमेरिकेंतील पतीवर कांहीं परिणाम होणार नाहीं असा त्यांचा विश्वास आहे.

**गुन्हेगाराची सुटकेची किंमत**—फ्रान्समध्यें शिक्षा झालेल्या एका गुन्हेगारानें आपल्या सुटकेच्या मोबदल्यांत बँक ऑफ फ्रान्सचे ३ लक्ष पौंडांचे गुप्त ठिकाणीं असलेलें सोनें दाखवून देण्याचें कबूल केलें आहे. सुटकेखेरीज सोन्यापैकीं ५ टक्के सोन्याचीही मागणी त्यानें केली आहे.

**फ्रान्समधील रशिअन नागरिक परतले**—गेलीं २५ वर्षें फ्रान्समध्यें वास्तव्य करीत असलेले ३ हजार आर्मिनिअन आणि जॉर्जिअन वंशाचे रशिअन नागरिक नुकतेच रशिआला परत गेले. त्यांना नेण्यासाठीं एक सोव्हिएट जहाज मुद्दाम मार्सेल्स बंदरांत आलें होतें. ह्या नागरिकांत, शास्त्रज्ञ कलावंत, डॉक्टर्स, एंजिनिअर्स असे अनेक धंद्यांतील लोक आहेत.

**सोव्हिएट शास्त्रज्ञ जगाच्या पुढें जाणार ?**—सोव्हिएट रशिआंतील शास्त्रीय विद्यापीठाची खास बैठक मास्कोच्या ८०० व्या वाढदिवसानिमित्त भरली होती. विद्यापीठाचे अध्यक्ष मि. व्हॅव्हिलॉव्ह ह्यांनीं ह्याप्रसंगीं असें जाहीर केलें कीं जगांतील शास्त्रीय ज्ञानाच्याही पुढें लवकरच मजल मारण्याचा आदेश एम्. स्टॅलिन ह्यांनीं सोव्हिएट शास्त्रज्ञांना दिला आहे.


**गव्हाच्या पेरणीवरील निर्बंध रद्द**—जगांतील अन्नधान्याची टंचाई लक्षांत घेऊन ऑस्ट्रेलिआंतील १९४९ सालाच्या पेरणीच्या मोसमांत गव्हाच्या पेरणीच्या क्षेत्रावरील सर्व निर्बंध रद्द करण्यांत आले आहेत, असें ऑस्ट्रेलिआच्या व्यापारमंत्र्यांनीं जाहीर केलें आहे.

**सोन्यावरील कर रद्द होणार ?**—सोन्याचें उत्पादन वाढविण्यास उत्तेजन देण्याचे हेतूनें ऑस्ट्रेलिआचें सरकार सोन्यावरील कर रद्द करण्याचा विचार करीत आहे असें समजतें.

---

### जेकॉप इंजिनिअर्स लि., पुणें

श्री. ह. वा. काणे, बनारस हिंदु विश्वविद्यालयाचे यंत्र विशारद, हे गेली १०–१२ वर्षें स्वतंत्र कारखाना चालवीत आहेत, हें पुण्यांतील लोकांस चांगले माहीत आहेच. यांचा विशेष म्हणजे, जे इतर लोक करीत आहेत नाहींत तें म्हणजे नवयंत्र निर्मिति व नवीनवीन वस्तु निर्माण करून तितक्या प्रमाणांत परदेशी मालाचें उच्चाटण करण्याचा यत्न करणें, हें होय. या त्यांच्या प्रयत्नास अधिक वाव मिळावा म्हणून, ते आतां आपला कारखाना "जेकॉप इंजिनिअर्स लि." या नांवानें सामुदायिक भांडवलाचा करीत आहेत, व त्यांचे डायरेक्टर मंडळांतील त्यांनीं मिळविलेले प्रथितयश गृहस्थ पाहिले, म्हणजे अशाहि व्यक्तींना त्यांचें कर्तृत्व पटलें आहे असें दिसतें. जनतेनें त्यांचे शेअर्स मोठ्या प्रमाणांत घेतल्यास वाढत्या कारखानदारीस, तसेंच महाराष्ट्रीय कर्तृत्वास व देशी धंद्यास उत्तेजन मिळून भागीदारांचा स्वतःचाहि फायदा होऊं शकेल. लिमिटेड कंपनीनें चालू कारखाना विकत घेतला असल्याकारणानें प्रथम वर्षींहि डिव्हिडंड वांटण्यास [illegible]



## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ, विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर






## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून ) + व्याजवजा

सासाहिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार ९।९।४७ | बुधवार १०।९।४७ | गुरुवार ११।९।४७ | शुक्रवार १२।९।४७ | सोमवार १५।९।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६१७-८; २४२७-८ | १००-१३-४ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | | १८५२-८ | | १६९०+ | |
| ६३८; ४५७-८ | १९-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | ३७४-८ | | ३४३ + | |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगॉल स्टील | १० | | २७-० | | २६-४ | |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | | ३३-१४ | | ३३-३ | |
| १२७७-८; २१३२-८ | १२-८-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | १०३७-८ | | १००७-८ | |
| ११८०; ६५८ | ६-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | ५६१ | | ५४४ + | |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | | ५७४ | | ५५५ | |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | | ३०१ | | २९० | |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिमले | १०० | बाजार बंद | २९३ | बाजार बंद | २८९ | बाजार बंद |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | | ३११ | | ३०३ | |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | | २२६ | | २२० | |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | | ४-१ | | ३१५-६ | |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | १५-७ | | १५-० | |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्ड्स | १ | | २-१३ | | २-१३ | |
| १०९२-८; ७३५ | २१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | ५८७-८ | | ५७७-८ | |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | १६२ १२ | | १६०-८ | |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | २६६ | | २६१ | |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | ४६६-४ | | ४६१-४ | |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | | ३१-६ | | ३०-१४ | |

## इराण-रशिया तेढीच्या आगींत अमेरिकन आश्वासनाचें तेल

इराणचे पंत प्रधान ह्यांनीं इराणमधील रशियन वकिलास ता. ४ ऑगस्ट, १९४६ रोजीं पत्र लिहून, रशिया-इराण संयुक्त तेल कंपनीबाबत खालील अटी मान्य केल्या:—

(१) उत्तर इराणमधील तेलाच्या खाणी चालविण्यासाठीं रशिया व इराण ह्यांची एक संयुक्त कंपनी स्थापन करण्यांत यावी. (२) पहिली २५ वर्षे कंपनीच्या ४९% भागांवर इराणची व ५१% भागांवर रशियाची मालकी रहावी. (३) भागांच्या प्रमाणांत नफा वाटणी व्हावी. (४) कंपनीचें व्यवहारक्षेत्र नकाशांत दाखविल्याप्रमाणें असावें. (५) नकाशांत दाखविलेल्या रेषेच्या पश्चिमेकडील प्रदेशांत इराणी सरकारनें विदेशी हात अथवा भांडवल असणाऱ्या इराणी कंपन्यांना तेलाबाबत कोणत्याहि सवलती देऊं नयेत. (६) इराण सरकारनें दिलेली खाणींची जमीन हें त्याचें भांडवल समजलें जाईल. तेलाच्या उत्खननासाठीं होणाऱ्या खर्चाचे रुपानें रशिया भांडवल पुरवील. (७) कंपनीची आयुर्मर्यादा ५० वर्षे राहील. (८) त्यानंतर वाटलें तर इराणी सरकारनें रशियाचे कंपनींतील भाग विकत घ्यावेत किंवा व्यवहार पूर्वीसारखाच चालू ठेवावा. (९) ह्या कराराला इराणच्या विधिमंडळाची २४ ऑक्टोबर १९४६ पूर्वी मान्यता मिळवावी.

वरील अटींप्रमाणें, इराणच्या पंतप्रधानानें अद्याप आपल्या विधिमंडळाची वरील करारास मान्यता मागितलेली नाहीं. ह्याबाबत रशियानें निकड चालविली आहे आणि इराणनें आपला शब्द मोडल्याची तक्रार केली आहे. "इराणच्या सरकारवर कोणतेंहि दडपण आणण्यांत येतां कामा नये. असें दडपण आल्यास त्याचा प्रतिकार करण्याच्या इराणच्या स्वातंत्र्याचा अमेरिका पुरस्कार करील" असें तेहरानमधील अमेरिकन वकिलानें जाहीर केलें आहे. इराणनें रशियाला तेलाच्या खाणींबाबत सवलती दिल्या, तर त्या संबंधांत ग्रेट ब्रिटनचा तत्त्वतः विरोध नाहीं, असें तेहरानमधील ब्रिटिश वकिलानें इकडे जाहीर केलें आहे. मध्यपूर्वेत रशियाचें वजन वाढूं नये, ह्या दृष्टीनें युरोपांतील व भूमध्य समुद्रांतील राजकारणांत व अर्थकारणांत ब्रिटिश व अमेरिकन सरकार ह्यांची एकजूट आहे. रशियाच्या वर्चस्वास आळा घालण्याची जबाबदारी अमेरिकेनें सर्व जगाच्या वतीनें आपण होऊन पत्करली आहे, त्यास ग्रेट ब्रिटनचा पाठिंबा असला तरी रशियाशी सलोख्याचे संबंध ठेवण्याची ग्रेट ब्रिटनची अजूनहि धडपड चालू आहे. अमेरिकेच्या सहाय्याचे आधारावर, इराण आपल्या उत्तरेकडील रशिया-इराण सीमेवर तुकड्या पाठविण्याइतका धीट झाला आहे. अशा रीतीनें, इराणच्या तेलाचे प्रश्नामुळें तंग वातावरण निर्माण झालें आहे.

**प. पंजाबचा ऑर्डिनन्स रद्द**— पश्चिम पंजाबमधील बँकांस, प्रांताबाहेर त्यांची मालमत्ता व शिंदगी हलविण्यास प्रतिबंध करणारा ता. ४ सप्टेंबरचा ऑर्डिनन्स प. पंजाबच्या गव्हर्नरानें एक नवीन ऑर्डिनन्स काढून रद्द केला आहे. गव्हर्नरांनीं लाहोरमधील बँकांच्या प्रतिनिधींची सभा भरवून तींत प. पंजाबमधील बँकांचा कारभार सुरक्षित कसा चालेल ह्याविषयीं चर्चा केली.

**संप न करणाऱ्या कारकुनांनाच बोनस**—कलकत्ता येथील इंपिरिअल बँकेच्या शाखांतील सुमारें १,५०० कारकुनांनीं लेखण्या खालीं ठेवून नुकताच संप केला. ह्यापूर्वी झालेल्या संपांत ज्यांनीं भाग घेतला नव्हता त्यांच्या निष्ठेचें बक्षीस म्हणून कांहीं अधिकाऱ्यांना आणि कांहींच्या बायकांना बँकेतर्फे कांहीं रकमा देण्यांत आल्या. त्याच्या निषेधार्थ वरील संप करण्यांत आला होता. बँकेच्या हिंदी नोकर वर्गाच्या असोसिएशनच्या सेक्रेटरीचें ह्या बाबत असें म्हणणें आहे कीं, बँकेच्या वरील कृतीनें सर्वच नोकर वर्ग निष्ठारहित ठरतो.

## सोव्हिएट रशिआंतील कामगार आणि संप

'लोकयुगा'च्या ता. २४ ऑगस्टच्या अंकांत 'सरल पात्रा' नांवाच्या एका लेखकानें रशिआंतील कामगार आणि संप ह्या विषयासंबंधीं कांहीं माहिती दिली आहे. सर्व जगभर संप चालू असतां रशियांत ते झाल्याचें कोठें ऐकूं येत नाहीं. तेव्हां, ह्या विषयासंबंधींची माहिती 'अर्था'च्या वांचकांना देण्यासाठी सदर लेखाचा अनुवाद पुढें दिला आहे.

कांहीं दिवसांपूर्वी 'प्रवदा' ह्या कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रानें एक लेख लिहून, सोव्हिएट रशिआच्या कारखान्यांच्या वरिष्ठ नोकरशाहीला असें बजाविलें, कीं कामगारांच्या सुखसमाधानाकडे दुर्लक्ष होत असल्यानें कारखान्यांतून अस्थिर वातावरण उत्पन्न होत आहे ही गोष्ट चांगली नाहीं. भांडवलशाही राष्ट्रांतून औद्योगिक कलहांची जबाबदारी फक्त कामगारांवरच टाकण्यांत येते; आणि सरकारचे सर्व प्रयत्न कामगारांना दडपून टाकण्यासाठींच होतात. 'प्रवदा'तील लेखांत मात्र ह्याच्या उलट वृत्ति दिसून येते. सोव्हिएट रशिआंत प्रथमपासूनच औद्योगिक कलह कमी करण्याकडे सरकार लक्ष पुरवूं लागलें. ह्या प्रयत्नांत कामगारांना तोशीस लागूं न देण्याची खबरदारी मुद्दाम घेण्यांत येत असे. रशिआंत संपविरोधी कायदा नाहीं; आणि कामावरून माणसें काढण्यांतही येत नाहींत. सर्व कामगारांना समाजच काम देतो. रशियाच्या राज्यघटनेप्रमाणें कोणाही व्यक्तीला आपल्यासाठीं दुसऱ्याला श्रम करण्यास लावण्याचा अधिकार नाहीं. कांहीं थोडे पुरुष आणि स्त्रिया स्वतंत्र धंदा करून चरितार्थ चालवितात. उदाहरणार्थ शिंपी, न्हावी, परीट, मासे धरणारे कोळी, वृत्तपत्रव्यवसायिक, कलावंत, इत्यादि.

### बेकारीचें उच्चाटन

सोव्हिएट रशिआच्या औद्योगीकरणाला खरी सुरवात १९२८ सालापासून, म्हणजे पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या प्रारंभापासून झाली. तेव्हांपासून रशिआंतील शब्दकोशांतून बेकारी हा शब्दच नाहींसा झाला. त्याच्या उलट काम करणाऱ्या माणसांची चाणच भासूं लागली. जीवनाची शाश्वति हे सोव्हिएट रशिआंत ध्येय राहिलेलें नसून ती प्रत्यक्ष वस्तुस्थिति झाली आहे. रशिआंतील कोणत्याही पंचवार्षिक कार्यक्रमांत उत्पादनाच्या वाढीबरोबरच वेतनांतही वाढ होण्याची तरतूद केलेली असते. १९५० सालीं कामगारांचें सरासरी वेतन १९४० सालापेक्षां ४८ टक्क्यांनीं अधिक होईल. खाणी आणि आरोग्याला घातक अशा उद्योगधंद्यांतून काम करणाऱ्या कामगारांना दरमहिना दोन हजार रूबल्स पगार मिळतो. १९४६ च्या जानेवारींत कांहीं प्रकारच्या कामगारांचें दैनिक सरासरी वेतन पुढीलप्रमाणें होतें.

| | |
|---|---|
| कोळसा–खाणी–कामगार | १९·५० रूबल्स |
| कोसंड–खाणी–कामगार | १९·३० रूबल्स |
| अन्नाच्या–धंद्यांतील कामगार | १३·०० रूबल्स |

सर्व उद्योगधंद्यांतील कामगारांचें मिळून दैनिक सरासरी वेतन १७·२६ रूबल्स किंवा १० रु–५–१० पै येवढें होतें. सोव्हिएट रशिआ हा एकटाच देश असा आहे कीं, त्यांतील वेतनावर अगर पगारावर काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला भरपगारी वार्षिक सुटी मिळाल्याशिवाय रहात नाहीं. युद्धकालीं सोव्हिएट रशिआंत रोजचे कामाचे तास ७ तासांऐवजीं १० ते १२ तास पर्यंत वाढविण्यांत आले. (खाणीकामगारांचे कामाचे युद्धपूर्वक कामाचे तास सहाच होते.) परंतु आतां ते पुन्हा ८ तासांवर आणण्यांत आले असून, खाणीकामगारांना ७ च तास काम दिलें जातें. सोव्हिएट रशिआंत कामगारांसाठी आरोग्यकेंद्रें आणि रुग्णालयें असून, त्या ठिकाणीं त्यांना आपली पगारी सुटी घालवितां येते. कारखान्यांतून कोणत्याही क्षणीं वैद्यकीय मदत मिळण्याची सोय असते. त्याशिवाय ट्रेड युनिअनचे आणि सरकारचे तपासनीस कामगारांच्या आरोग्याचे व सुरक्षिततेचे नियम पाळले जातात कीं नाहीं ह्याबद्दल दक्ष असतातच. तथापि पगार व काम करण्यासंबंधींची परिस्थिति ह्यासंबंधीं मतभेद नेहमींच होत असतात. हे मतभेद योग्य रीतीनें आणि लवकर मिटविण्यासंबंधीं व्यवस्था करण्यांत आलेली आहे.

### तंटे कसे सोडवितात?

तंटे सोडविण्यासाठी 'रेट्स अँड कॉन्फ्लिक्ट्स कमिशन' नांवाची एक संस्था असते. ह्या संस्थेवर कारखान्यांतील कामगार वर्गाचे व चालकांचे सारखे प्रतिनिधी घेतलेले असतात. हे कमिशनच औद्योगिक कलह तडजोडीनें मिटविण्याचें प्रमुख साधन आहे. कारखान्यांतील कामगारांच्या संख्येनुरूप कमिशनवरील त्यांचे प्रतिनिधी कामगार निवडतात, किंवा त्यांची स्थायी समिती प्रतिनिधींची नेमणूक करते. ज्या कारखान्यांतून १०० पेक्षा कमी कामगार असतील अशा ठिकाणीं त्याच्या कमिशनवर कामगारांतर्फे एक आणि चालकांतर्फे एक प्रतिनिधी नेमण्यांत येतो. १९४० च्या पहिल्या तीन महिन्यांत मास्कोमधील सगळ्यांत मोठ्या पोलादाच्या कारखान्यांतील कमिशननें २६८ तंटे तडजोडीनें मिटविले. कमिशनचा एखाद्या मुद्यावर मतभेद झाला तर प्रकरण 'कन्सिलिएशन बोर्डा'कडे नेण्यांत येते. ह्या बोर्डावर सुद्धां ट्रेड–युनिअनचे आणि चालकांचे सारखे प्रतिनिधी असतात. क्वचित् प्रसंगीं ह्याच बोर्डावर एक निपक्षपाती अध्यक्ष नेमून तवाद निवाडाही करण्याची व्यवस्था ठेवलेली आहे. बहुतेक प्रसंगीं ट्रेड युनिअनची मध्यवर्ती कचेरी आणि कारखान्यांचे चालक ह्यांच्यांत प्रत्यक्ष बोलणीं होऊनच वाद मिटविला जातो. पण कांहीं बाबतींत कोर्टाकडे जाण्याचाही मार्ग मोकळा असतो. उदा. मागील पगार वसूल करण्यासंबंधीं अशा सोयीचा फायदा घेता येतो. कधीं कधीं सरकारच्या वरिष्ठ खात्यासंबंधींही तक्रार व वाद उत्पन्न होतात त्यासंबंधीं एक उदाहरण असें:–१९४० सालीं पीपल्स कामिसारिएट फॉर लाइट इंडस्ट्रीज ह्या सरकारी खात्यानें आपल्या चाळींतील विजेचे व इतर दर वाढविले. ट्रेड युनिअनच्या मध्यवर्ती कौन्सिलनें ह्या वाढीस विरोध केला आणि अखेर सरकारी खात्यास वाढलेले दर पूर्वीप्रमाणें करावे लागले. पंचवार्षिक कार्यक्रमांची सुरवात आणि अंमलबजावणी होऊं लागल्यापासून बेकारी, दरिद्री पगार, आणि म्हणूनच संप नष्ट झाले आहेत. भांडवलशाहीच्या वारसा-हक्काचे हें जोखड झुगारलें गेलें आहे. १९२१ सालीं सोव्हिएट ट्रेड युनिअन्सतर्फे सरकारी नोकरशाहीविरुद्ध कामगारांना संपाची तयारी करण्याबद्दल सांगण्यांत आलें होतें. १९२४ ते २६ च्या दरम्यान सरकारी कारखान्यांतून ४२६ आणि खाजगी कारखान्यांतून २४८ संप झाले. १९२८ ते ३० च्या दरम्यान फक्त ५४ संप झाले. सोव्हिएट रशिआंत १५ वर्षांपूर्वी शेवटचा खाजगी मालकीचा कारखाना नाहींसा झाला. तेव्हांपासून संपांची संख्या रोडावतच चालली तथापि १९४६ सालीं मास्कोतील एका कारखान्यांत संप झालाच. ह्या कारखान्यांतील चालकांनीं युद्धामुळें निकृष्टावस्थेस पोंचलेल्या कामाच्या परिस्थितींत सुधारणा करण्याचें नाकारलें; आणि त्यामुळें संप करण्यांत आला. हा संप पूर्णपणें कायदेशीर होता आणि त्यासंबंधींचें वृत्त मास्कोमधील वृत्तनियंत्रकांनीं बाहेर पाठविण्यास हरकतही घेतली नाहीं.

### ट्रेड युनिअनचे अधिकार

कांहीं कांहीं बाबी अशा आहेत कीं त्यांसंबंधीं ट्रेड युनिअनचा शब्द हाच कायदा आहे. सामाजिक विम्यासाठीं (सोशल इन्शुरन्स) किती रक्कम बाजूला काढून ठेवावी आणि नोकरी देणाऱ्या संस्थांनीं त्यासाठी किती रक्कम कर म्हणून द्यावी हें युनिअनच दरवर्षी ठरविते. त्याचप्रमाणें कामगारांच्या सुरक्षिततेविषयींचे कायदे व त्यांची अंमलबजावणी म्हणून चालकांकडून अगर कामगारांकडून दंड वसूल करण्याचाही अधिकार युनिअनला असतो. जरूर तर कोर्टाची मदतही युनिअनला घेतां येते. चालकांनीं दुराग्रह धरला तर त्यांना आपल्या म्हणण्याप्रमाणें वागविण्याचा हक्कही युनिअनला असतो. ह्या हक्कांत नियमांची पाळणूक होईपर्यंत कारखाना बंद ठेवण्याच्याही हक्काचा समावेश आहे. झारशाहींत कामगारांचे संप चिरडून टाकण्याचें धोरण असे, आणि तेंच धोरण अजून भांडवलशाही देशांतून अवलंबविण्यांत येते. पण सोव्हिएट राशिआंत क्रांति झाल्यापासून संपाबाबत तें मिटविण्याचें धोरण देशांतील समाजवादी सरकारनें अमलांत आणलें आहे.

हिंदुस्थानांतील उत्पादन घटत चालल्यानें कामगारांनीं अधिक काम करावें अशी सरकारची व कारखानदारांची अपेक्षा आहे. सोव्हिएट रशिआंतील कामगारांना उत्पादन वाढविण्यासाठी काय प्रलोभनें असतात हे वरील माहितीवरून "अर्था"च्या वाचकांच्या लक्षांत येईल.

ग. रा. जोग

---

**ग्वाल्हेरमध्यें संशोधन-शाळा**—ग्वाल्हेर संस्थानांत शास्त्रीय संशोधनाला उत्तेजन देण्याच्या हेतूनें एक औद्योगिक संशोधन-शाळा स्थापन करण्यांत आली आहे. संस्थेसाठीं ५ लाख रुपये खर्चून इमारत बांधण्यांत आली असून संशोधनासाठी शास्त्रीय उपकरणेंही मिळविण्यांत येत आहेत.

**ताग घ्या, अन्न द्या**—हिंदुस्थान सरकार व अर्जेंटाइन सरकार ह्यांचेमध्यें ऐनजिनसी विनिमयाबाबत एक करार झाला आहे. हिंदुस्थान ६० हजार टन तागाचा माल पुरविणार आहे. त्याचे बदली अर्जेंटाइन धान्य देणार आहे. तागाच्या गिरण्यांनीं उत्पादन वाढविण्याचे कामीं सहकार्य करण्याचें ठरविलें आहे आणि सरकारहि कोळशाचा पुरवठा अपुरा पडूं न देण्याची दक्षता बाळगणार आहे.

**हिंदी एअर होस्टेसेस**—"ट्रॅन्स वर्ल्ड एअर लाइन" नांवाची विमानवहातुक संस्था अमेरिका व हिंदुस्थान ह्यांचेमध्यें उतारूंची ने-आण करिते. प्रवाशांच्या सुखसोई पहाण्यासाठीं प्रत्येक विमानांत एक सहाय्यिका असते. अशा सहाय्यिकांच्या जागीं सहा हिंदी मुलींची प्रथमच नेमणूक वरील विमानवहातुक संस्थेनें केली आहे. त्यांना त्यांच्या कामाचें कैरो येथें सहा आठवडे प्रथम शिक्षण देण्यांत येईल. नेमण्यांत आलेल्या मुलींचीं नांवें पहाता, त्या हिंदी असल्याचा खुलासा करण्यांत आला आहे हें ठीकच झालें.

**नाशिकजवळील नवें धरण**—नाशिकच्या वायव्येला ८ मैलांवर असलेल्या गंगापूर येथील धरणाच्या कामाला लवकरच प्रारंभ होणार आहे. धरण पुरें झाल्यावर ६१,००० एकर जमीन पाटाच्या पाण्याखालीं येणार आहे. ह्या धरणाला सुमारें २ कोटी रुपये खर्च येईल. धरण पुरें झाल्यावर गोदावरीच्या सध्याच्या कालव्यांना अधिक पाणी देतां येईल आणि नाशिक शहराला पाण्याचा पुरवठा करता येईल. धरणावर वीजही उत्पन्न करता येईल. ह्या कामाला चार वर्षांचा काळ लागेल आणि त्यावर सुमारें २। टक्के नफा सुटेल असा अंदाज आहे.


## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## दि बँक ऑफ औंध लि.

(औंध संस्थानांत स्थापन झालेली- भागिदारांची जबाबदारी नियमित)

रजिस्टर्ड ऑफिसः—औंध

—ः मुख्य बिझिनेस ऑफिसः—

१११।११२ सदाशिव पेठ, सातारा शहर.

—औंध संस्थानांतील शाखा—

आटपाडी, भवानी नगर व ओगलेवाडी.

- चालू, मुदतीच्या व सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.
- तीन वर्षे मुदतीचीं कॅश सर्टिफिकेटस् विकत मिळतात.
- योग्य तारणावर कॅश क्रेडिट्स्, कर्जे व ओव्हर ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

अधिक माहितीसाठीं समक्ष अगर पत्रद्वारें चौकशी करा.

बा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि रत्नाकर बँक लिमिटेड.

ऑफिसें:—१ कोल्हापूर, २ शाहुपुरी, ३ सांगली, ४ मिरज, ५ जयसिंगपूर.

चेअरमनः—नामदार बी. बी. पाटील, बी. ए, एलएल. बी., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ६,१७,१०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३,१३,६०० |
| खेळतें भांडवल अंदाजें | १५,००,००० |

—ः अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात. ः—

एल्. एन्. शहा,
बी. कॉम., सी.ए.आय. आय. बी.
मॅनेजर

—महाराष्ट्रांतील—

प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

## दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २

—आमची वैशिष्ट्यें—

(१) काटकसरीचा कारभार (२) खर्चाचें अल्प प्रमाण (३) क्लेम्स तावडतोब पटविणें (४) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन (५) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर

## सह्याद्रि विमा कंपनी लिमिटेड, नासिक

### मूल्यमापनांतील अभिनंदनीय वाढावा

१९४६ सालीं कंपनीनें ५० लाखांचेवर विमा काम पूर्ण केलें. कंपनीकडे त्या वर्षी हप्त्यांचे रुपानें रु. ५,६२,००० जमा झाले. खर्चाचे प्रमाण शें.१४·६६ वर झालें असून सरासरी व्याजाचा दर ३·८४ पडला आहे. सन १९४२ ते ४६ चे पांच वर्षांत कंपनीकडे १,४४,००,००० रुपयांचें पूर्ण विमा काम आलें असून हप्त्यांच्या रूपानें १५,००,००० जमा झाले आहेत. १९४६ अखेर कंपनीचा आयुर्विमानिधी रुपये ७,९२,००० झालेला आहे. पहिल्या पंचवार्षिक प्रगतीशीं तुलना करतां ही प्रगति सर्व दृष्टींनीं अत्यंत समाधानकारक असून दसपटीनें तरी अधिक झालेली आढळून येईल. या भूषणावह प्रगतीचा अहवाल देतांना संस्थेचे व्यवस्थापक श्री. गोपाळराव सौंदणकर व श्री. वा. का. जोशी यांनीं कंपनीचे स्थापनेपासून केलेल्या अविश्रांत श्रमाबद्दल व तत्त्वनिष्ठेबद्दल त्याचप्रमाणें त्यांचे कर्तबगारीबद्दल गौरवपूर्ण उल्लेख अध्यक्षांनी केला. ओरिएंटलचें २५·३५ चे मृत्यूचें प्रमाणापेक्षां दोन व तीन अधिक धरून नफ्यासह विमा–पत्रासाठी खर्चाची तरतूद शेंकडा १८ प्रमाणें करण्यांत आली. व्याजाचा दर शें. ३॥ धरण्यांत आला. दर वर्षी दर हजारीं रु ५ व रु.६ इंटेरिम बोनस विमेदारांना दिला जावा, ह्या विमातज्ञांनीं केलेल्या शिफारशीस वार्षिक सभेनें सर्वानुमतें मंजुरी दिली.

छापखान्याचें नामकरण — नाशिक रोड येथील " सिक्युरिटी प्रिंटिंग, इंडिआ " ह्या छापखान्याचें नांव " इंडिआ सिक्युरिटी प्रेस " असें ठेवण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे.


## मुंबई सरकारचें गुदाम विषयक बिल

धान्याच्या साठवणुकीसाठी लागणाऱ्या कोठारांवर नियंत्रण ठेवणारें व त्यासाठी परवाना देणारें एक बिल मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. शेतीच्या मालाचा सांठा करण्यासाठी कोठारें बांधण्यास उत्तेजन देणें आणि त्यांच्या वापरावर देखरेख व नियंत्रण ठेवणें हा ह्या बिलाचा उद्देश आहे. कोठारावरील अधिकाऱ्यानें कोठारांत ठेवलेल्या मालाची पावती द्यावी आणि ह्या पावतीच्या तारणावर माल ठेवणाऱ्या माणसाला थोड्या व्याजाच्या दरानें अल्प मुदतीचीं कर्जें मिळावीं, अशी योजना आहे. ही पावती मालकाच्या केवळ सहीनें हातोहात फिरूं शकेल. ह्या योजनेसाठी लागणारा पैसा प्रांतिक आणि इतर सहकारी बँकांतर्फे पुरविण्यास रिझर्व्ह बँक तयार आहे. ह्या कायद्यामुळें शेतकऱ्यांना मालाच्या तारणावर अल्प मुदतीचीं कर्जें थोड्या व्याजाच्या दरानें मिळून, मंदीच्या बाजारांत नाइलाजानें माल विकण्याची पाळी त्यांच्यावर येणार नाहीं.

एकीकरण—टॅरीफ बोर्ड आणि कमॉडिटी प्राइसेस बोर्ड ह्या दोन संस्था अधिक कार्यक्षमतेच्या दृष्टीनें एक करण्याचा हिंदुस्थान सरकार विचार करीत आहे.

निवृत्त सैनिकांना नोकऱ्या — सरकारनें स्थापन केलेल्या एम्प्लॉयमेंट एक्सचेंजचा उपयोग नोकरी हवे असणारे कामगार आणि मालक अधिकाधिक करूं लागले आहेत. जुलै १९४७ अखेरपर्यंत एकूण २,०९,७४५ लोकांना नोकऱ्या लावून देण्याची कामगिरी वरील संस्थेनें केली आहे. वरील संख्येंतील १,४१,३१२ लोक लष्करांतून निवृत्त झालेले आहेत.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
खादी मन्दिर
—खादीचें माहेरघर—
२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

पेटणेकर आणि कंपनी लि.,

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




साठे बिस्किटें
ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.
प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें।
साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

# विजय टेक्सटाइल्स लि.

—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंट्स.



# दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

स्थापना सन १९२७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० दोन लक्ष | रुपये |
| भरलेलें भांडवल | ७१,२२० | रुपये |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० चे वर | रु. |
| खेळतें भांडवल | ९,००,००० | रुपये |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासद, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जे दिलीं जातात. सोन्याचे तारणावर ३ टक्के व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, रेल्वे रसीदची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर



दी

# बँक ऑफ कोल्हापूर, लि.

*( कोल्हापूर येथें सन १९२६ सालीं स्थापन झालेली व भागिदारांची मर्यादित जबाबदारी असलेली.)*

एच. एच. दी छत्रपति महाराजासाहेब ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ४०,०६,५०० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. | २०,१६,००० |
| भरलेलें (३०-६-४७) | रु. | ३,०५,४७० |
| रिझर्व्ह (३०-६-४७) | रु. | ५,८६,६६० |

एकूण खेळतें भांडवल रु. १,००,००,००० हून अधिक

मुख्य कचेरी—बँक ऑफ कोल्हापूर बिल्डिंग, लक्ष्मीपुरी-कोल्हापूर.

शाखा : संस्थानांतील:—(१) शाहुपुरी-कोल्हापूर, (२) गुजरी-कोल्हापूर, (३) जयसिंगपूर, (४) इचलकरंजी, (५) पेठ-वडगांव, (६) मलकापूर, (७) गडहिंग्लज. संस्थानाबाहेरील:—(८) मुंबई, (९) निपाणी (जि. बेळगांव)

★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★ योग्य तारणावर कर्जें, ओव्हरड्रॉफ्टस व कॅश क्रेडिटस दिलीं जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

★ मौल्यवान चजिवस्तु सुरक्षित ठेवणेसाठी हेड ऑफिसमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची उत्तम व्यवस्था.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

व्ही. ए. सावंत, अॅ. मॅनेजर



# दि बँक ऑफ कराड, लि.

कराड ( जि. सातारा )

( स्थापना : १२-३-१९४६ )

## पहिल्या नऊ महिन्यांतील प्रगति

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल .... | ५,००,००० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल ... | २,५०,००० रु. |
| वसूल केलेलें भांडवल.... | १,२५,००० रु. |
| ठेवी .... | १०,८०,००० रु. |
| एकूण खेळतें भांडवल... | १२,२२,००० रु. |

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

म. वि. खंडकर
मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.